
# शोध कोटसुंदरीचा

संपादन

**नंदकुमार मोरे**



# शोध कोटसुंदरीचा

संपादन

**नंदकुमार मोरे**

स्वच्छंद प्रकाशन
कोल्हापूर

**शोध काटेमुंढरीचा**

*Shodh Katemundharicha*

म । १३

ISBN : 978-93-83796-57-1

**प्रथम आवृत्ती :** ६ ऑक्टोबर, २०२२

© नंदकुमार मोरे

**प्रकाशक**

स्वच्छंद प्रकाशन

२१२, रत्नाप्पा कुंभार नगर को-ऑप. हौसिंग सोसा. नं. ५,

मोरेवाडी, कोल्हापूर : ४१६०१३

संपर्क : ७३८५५८८३३५

मुखपृष्ठ : राजेंद्र क्षीरसागर, नागपूर

रेखाटने : भाऊ दांदडे, नागपूर

शीर्षक सुलेखन : प्रभाकर भोसले, पुणे

आतील सुलेखन : राजवर्धन मोरे (इ. ५वी)

**मांडणी**

तेजस चव्हाण

**मुद्रक**

यश प्रिंटर्स, उद्यमनगर, कोल्हापूर

संपर्क : ९८९०३०८३९६

मूल्य : २५०/-

■ *या पुस्तकातील लेखकांची मते, घटना, वर्णने ही त्या लेखकांची असून त्याच्याशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.*

## अंतरंग


**प्रस्तावना : नंदकुमार मोरे**

**कुठे आहे ती काटेमुंढरी**

काटेमुंढरीच्या वाटेवर : गो. ना. मुनघाटे १९

काटेमुंढरीच्या सख्ख्या गावाची कहाणी : अनिल मुनघाटे २३

कुठे आहे, ती 'काटेमुंढरी'? : प्रमोद मुनघाटे २९

**काटेमुंढरीचा मास्तर**

कर्तव्यभावनेचा वस्तुपाठ : दिगंबर शिर्के ३९

दुर्गम भागातील शिक्षणाचा प्रयोग : रमेश वरखेडे ४६

नैराश्य झटकायला लावणारा अनुभव : हेरंब कुलकर्णी ४९

**काटेमुंढरीचा शोध**

शोध काटेमुंढरीचा : नंदकुमार मोरे ६१

बनगरवाडी ते काटेमुंढरी : नंदकुमार मोरे ८३

आदिम शहाणपणाचे तत्त्वज्ञान : तेजस चव्हाण १०९

**काटेमुंढरीचे शिक्षण**

शिक्षणाची वाट सुकर करण्याचं आशास्थान : नामदेव माळी १३३

शिक्षणाचे परिपूर्ण वर्तुळ : विश्वास सुतार १४०

शिक्षकांसाठी समर्पणाची प्रेरणा : दीपक मेंगाणे १५३

**काटेमुंढरीच्या पारंब्या**

अभ्यासक्रमात काटेमुंढरी आली, त्याची गोष्ट : अनिल गवळी १६३

काटेमुंढरी आपल्याला काय देते? : एकनाथ आळवेकर १६८

**हृद्गत**

नीला उपाध्ये, हेरंब कुलकर्णी १८१

# काटेमुंढरी आपल्याला काय देते?

## एकनाथ आळवेकर

गो. ना. मुनघाटे यांची 'माझी काटेमुंढरीची शाळा' आपल्याला काय देते? याचा शोध प्रस्तुत ठिकाणी घेण्याचे ठरविले आहे. ही कादंबरी केवळ एक साहित्यकृती नाही. ती केवळ विशिष्ट जीवनदर्शन देऊन थांबत नाही. तिच्यात देण्यासारखे बरेच आहे. ती आपल्याला एका ध्येयवेड्या शिक्षकाचे दर्शन देते. त्यांचा ध्येयवाद, निष्ठा, दयाबुद्धी, त्यांचे निसर्गप्रेम आणि अंहिसावादी विचारदृष्टी या कादंबरीत पाहता येते. याबरोबरच नानाविध जीवनमूल्ये जोपासणारी विविध व्यक्तिमत्त्वे काटेमुंढरीत भेटतात. काटेमुंढरीतील लोक अज्ञानी, गरीब आणि मागास आहेत. परंतु, त्यांच्याकडून शिकण्यासारखे खूप आहे. शिदूसारखा आदर्श विद्यार्थी येथे भेटतो. मडगू पाटलांसारखा निखळ देवमनाचा माणूस भेटतो. तो आपल्याला समाजनिष्ठा शिकवतो. निस्वार्थीपणाने साथ देण्याची त्याची वृत्ती येथे दिसते. आदिवासींच्या प्रथा, परंपरांबरोबर त्यांची उच्च जीवनमूल्ये या कादंबरीच्या निमित्ताने समजून घेता येतात. त्याग, सेवा, समर्पण हे गुण या कादंबरीतील विविध व्यक्तिरेखांकडून शिकता येतात. ही कादंबरी शिक्षणाची नवी परिभाषा शिकवते. शिक्षकांना घडवते. त्याबद्दलची चर्चा येथे करू.

### ध्येयवेड्या शिक्षकाचे दर्शन

'माझी काटेमुंढरीची शाळा' ही कादंबरी आदिवासी खेड्यात काम केलेल्या एका शिक्षकाचे आत्मकथनच वाटते. लेखक स्वतःच या लेखनाला कादंबरी म्हणत असल्याने या पुस्तकाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो. अन्यथा कोणाही वाचकाला हे एका ध्येयवेड्या शिक्षकाचे आत्मकथनच वाटेल. शिक्षक म्हणून काटेमुंढरीत रुजू होण्यापासून निवृत्तीनंतरच्या काळापर्यंतचे कथानक कादंबरीत येते. अज्ञान, दारिद्र्याने पिचलेल्या दुर्गम आदिवासी खेड्यात जेथे शिक्षणाचा गंध नाही, अशा ठिकाणी शिक्षणाबद्दल आस निर्माण करणारे ध्येयवेडे शिक्षक या कादंबरीचे नायक आहेत.



त्यांनी एका ध्येयवादाने झपाटून जंगलात गुराढोरांमागे फिरणाऱ्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले. त्यांच्याशी स्नेहाचे, जिव्हाळ्याचे नाते निर्माण केले. घटलेल्या पटसंख्येत वाढ केली. मोडकळीला आलेली शाळा नव्याने उभी केली. आदिवासी मुलं शाळाबाह्य होऊ नयेत म्हणून त्यावर उपाय शोधले. त्यांच्यात शिक्षणाबरोबर पशू, पक्षी आणि पर्यावरणाबद्दल जागृती निर्माण केली. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणविषयक निर्माण होणारे भान, ही काटेमुंढरीची शिकवण आहे.

गुरुजींनी आदिवासी मुलांना शिक्षणाबरोबर संस्कारशील केले. त्यांची संस्कृती समजून घेतली. काटेमुंढरीच्या गुरुजींचा शब्द गावकरी प्रमाण मानू लागले. रूपगडच्या रूपचंद महाराजांपर्यंत शाळेची कीर्ती पोहोचली. कौतुकाबरोबर शाळेच्या इमारतीसाठी भरघोस मदतही राजाकडून मिळाली. मुलांबरोबर त्यांचे आईबापही व्यवहारात साक्षर बनले. आदिवासी भागातील शिक्षण समस्येवर काटेमुंढरीच्या गुरुजींनी उपाय शोधले. त्यात ते यशस्वी झाले. गुरुजींच्या निवृत्तीनंतर त्यांचाच विद्यार्थी शिदू त्या शाळेचा मुख्याध्यापक झाला. त्याच्या शैक्षणिक, सामाजिक कार्याबद्दल त्याला राष्ट्रपती पारितोषिक प्राप्त झाले. या गौरवामुळे आपली काटेमुंढरीची सेवा धन्य झाली, असे गुरुजींना वाटते. 'माझी काटेमुंढरीची शाळा'मध्ये माडिया-गोंड आदिवासी जीवनाचे दर्शन घडविणाऱ्या गुरुजींनी तेथे निष्ठापूर्वक केलेल्या कार्याचे विविध प्रसंग कादंबरीत येतात.

गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम, आदिवासी अशा काटेमुंढरी या गावात नेमणूक झालेले गुरुजी रुजू व्हायला जातात, या प्रसंगाने कादंबरीचा प्रारंभ होतो. वाटेतील ट्रक ड्रायव्हरचा हीरमोड करणारा प्रश्न विचारात न घेता ते एका दृढ निश्चयाने ट्रकच्या हौद्यात बसून काटेमुंढरीकडे निघतात. काटेमुंढरीची पार्श्वभूमी यापूर्वी अनेक अभ्यासकांनी नोंदवली आहेच. अशा गावात गुरुजी धैर्याने जाऊन आपले काम सुरू करतात.

गुरुजींनी आपल्या शालेय वयात, 'मला जर आपण जंगलात नेऊन सोडले तर मी प्रथम काटे घेणार.' असे सांगितले होते. पुढे पंचायत समितीकडून त्यांना शिक्षकाच्या नोकरीकरिता घेतलेल्या मुलाखतीत त्यांना प्रश्न विचारला, 'तुम्ही जंगलात जाऊन प्रामाणिकपणे नोकरी कराल काय?' त्यावेळीही त्यांनी 'जंगलात काय, दगडधोंड्यातही नोकरीसाठी जायला तयार आहे.' हे उत्तर दिले. गुरुजींना शिक्षकाची नोकरी फक्त पोटासाठी करायची नव्हती, तर अध्यापन हा त्यांनी धर्म मानला होता.

काटेमुंढरी गावच्या आदिवासी मुलांना शिकून शहाणे करण्याचे आव्हान गुरुजींनी स्वीकारले होते. काटेमुंढरीची शाळा सुरू करण्यापूर्वी पटावर नावालाच विद्यार्थी होते. अशा स्थितीत ते काम सुरू करतात. त्यांनी विद्यार्थी गळतीची कारणे शोधली. आदिवासींचे प्रश्न समजावून घेतले. मडगू पाटलाच्या मध्यस्थीने गावसभा घेतली.

'मी शिकून जसा शहाणा झालो तसे माझे भाऊ शिकून शहाणे व्हावे म्हणतो, म्हणून त्यांना नियमित शाळेत पाठवा.' असे भावनिक आवाहन गावकऱ्यांना केले. गावकऱ्यांनीही त्यांना आपल्या भाषेत 'इगो इगो' म्हणून प्रतिसाद दिला. शिक्षकांबद्दल विश्वास आणि आदरभाव गावकऱ्यांत निर्माण झाला. गुरुजींनी कर्तव्यनिष्ठा अशा अनेक प्रसंगातून दिसून येते. गुरुजी आपल्या कामांतून कामाची संस्कृती रुजवतात.

मुले शाळेत न येण्याची वेगवेगळी कारणे होती. गरिबी हे त्यापैकी एक मुख्य कारण होते. त्यावर उपाय म्हणून गुरुजींनी सांगितले, 'अंगावर कपडे नसतील तरी चालेल, कमरेला फक्त लंगोटी लावूनही विद्यार्थी शाळेत आला तरी शिकता येईल.' मग शिदूलाही शाळेत येण्याचा मार्ग मोकळा झाला. गुरुजींनी शाळेतील विद्यार्थी शिदूला विश्वासात घेऊन त्याच्याकडून मुले शाळेत येण्यासाठी कोणते उपाय करता येतील, हे समजावून घेतले. शिदूने सांगितले की, शाळा कधी ओढ्याकाठी भरवू, नदीकाठी भरवू. त्याप्रमाणे गुरुजींनी ओढ्याकाठी, नदीकाठी, टेकडीवर शाळा भरवली. मुलांना यात्रेमध्ये, जंगलामध्ये भटकायला दिले. अशी मुक्तशाळा भरवली. गोंडी बोलीत गुरुजींनी मुलांना प्रार्थना म्हणून दाखवली. आपल्या लहान भावंडांना सांभाळण्यासाठी घरी राहणाऱ्या मुलांनाही शाळा शिकता येईल अशी व्यवस्था केली. लहान मुलांना सांभाळण्याची जबाबदारी शाळेजवळच्या एका आजीवर सोपवली. असे करता करता शाळेची पटसंख्या तीसपर्यंत पोहोचली. विद्यार्थी शाळेत यायचे असतील त्यांचे मन रमवणारे काही प्रयोग करायला हवेत, हे गुरुजींनी ओळखले होते. त्यानुसार ते काही नवनवे प्रयोगही करत होते. पुढे काही काळातच काटेमुंढरीतील शिक्षक आणि विद्यार्थी दोन्ही आदर्श बनले. काटेमुंढरीला शिक्षकांनी प्रेम दिले, त्याबदल्यात शिक्षकांना हजार पटीने काटेमुंढरीकडून प्रेम मिळाले.

**आदिवासींचे जीवन आणि संस्कृती**

'माझी काटेमुंढरीची शाळा' या कादंबरीत माडिया-गोंड या आदिवासी समाजाचे चित्रण आहे. आदिवासी समाजाच्या प्रथा, परंपरा, त्यांची संस्कृती याबद्दलचे अनेक प्रसंग कादंबरीत येतात. काटेमुंढरी गावात प्रवेश केल्यानंतर त्याच रात्री गुरुजींना गावची सर्व पुरुष मंडळी गावाबाहेर ओढ्याच्या दिशेने जाताना दिसली. चौकशीअंती त्यांना समजते की, तिथे ग्रामसभा म्हणजे गावचे कोर्ट भरणार आहे. गावात झालेल्या मास्तराच्या खुनाची चौकशी करण्यासाठी दुसऱ्या दिवशी गावात पोलीस येणार होते. जो कोणी साक्ष देईल त्याचा 'धब्बा' करायचा, असे ग्रामसभेत ठरविले जाणार होते. धब्बा म्हणजे गावाच्या हिताच्या दृष्टीने जी व्यक्ती दोषी ठरली असेल तिला गावातून नष्ट करणे. शेजारच्या डोंगरावरील भुयारात गुन्हेगाराला टाकण्याची प्रथा होती.

आदिवासींच्या लग्न या संस्काराबद्दलचे प्रसंगचित्रण नावीन्यपूर्ण वाटते. माडिया-गोंड समाजाचे लग्न म्हणजे आदिम मानवाच्या जीवनशैलीचा उत्तम नमुना आहे. उत्सवाचा किंवा लग्नाचा आनंद सगळ्यांनी मिळून घेतला जातो. तसेच सगळ्यांनी मिळून दुःखही वाटून घ्यायची प्रथा आहे. गावात कुणाचा मृत्यू झाला तर सर्व लोक 'पोलो' पाळतात. म्हणजे काम बंद ठेवून दुःखात सहभागी होतात. प्रेताचे दर्शन घेताना सर्व गावकरी रडतात पण; प्रेताला मूठमाती देताना आनंद व्यक्त करतात. आदिवासी समाज मरणोत्सव कसा साजरा करतात, याचे चित्रण कादंबरीत येते. प्रेत स्मशानभूमीत नेण्यापूर्वी प्रेताचे दर्शन घ्यायचा रिवाज आहे. दर्शन घेताना प्रेताच्या शेजारी ठेवलेल्या नव्या उपरणावर प्रत्येक व्यक्ती रुपया, दोन रुपये अर्पण करते. शिदूच्या बापालाही एवढ्यासाठी आपला पितळी गडवा गहाण ठेवून चार-पाच रुपये हवे असतात. पैसे उसने ने, असे गुरुजी सांगतात. त्यावर शिदूचा बाप म्हणतो, ''नाई! मास्तरजी आम्हांला जे एक-दोन रुपये मुर्दावर ठेवा लागते, ते उधार उसनवार चालत नाई. तुमही नाई नोका मनू.' आदिवासींमध्ये एखाद्याच्या मृत्यूनंतर पैसे अर्पण करून आणि रडून दुःख व्यक्त करण्याची प्रथा असते. सामान्य माणसासाठीही सर्वांनी एकत्र येऊन दुःखवटा व्यक्त करण्याची आदिवासींची प्रथा महत्त्वाची वाटते. अंत्यसंस्कारप्रसंगी प्रत्येकाने पैसे ठेवण्याच्या पद्धतीमागे मरणक्रियेसाठी येणारा खर्च सगळ्या समाजाने उचलावा, अशी भावना असते. आदिवासींमध्ये प्रेत स्मशानभूमीत पुरले जाते. प्रेत पुरल्यानंतर प्रेताची आठवण म्हणून लांब दगडी शिलाखंड गाडून ठेवला जातो. या समारंभाला 'करसाळ' म्हणतात.

आदिवासींमध्ये कपडे परिधान करण्याबद्दलचेही काही संकेत आहेत. त्यातून त्यांच्या काही धारणा दिसून येतात. त्याचे योग्य चित्रण कादंबरीत आले आहे. अशाप्रकारे आदिवासी समाजामधील आचार-विचारांचे बंधन, लग्नउत्सवातील मुक्तपणा, मरणोत्सव साजरा करणे, पोशाख इत्यादीसंबंधी प्रथा, परंपरा सांगणारे प्रसंग कादंबरीत आहेत. आदिवासी समाजामध्ये राहणीमानाचे, पोशाखांचे काही विशिष्ट संकेत ठरलेले आहेत. त्यांचे पालन आदिवासी समाजाकडून होत असते. जर गैर आदिवासी व्यक्तीकडून त्या संकेतांमध्ये भंग करण्याचा प्रयत्न झाला तर मात्र त्या व्यक्तीला परिणामांना सामोरे जावे लागते. आदिवासी खेड्यात काही संकेत व अलिखित नियम त्यांच्या अंगवळणी पडलेले असतात. आदिवासींमधील संकेत हे त्यांच्या जगण्याचा भाग असतात. ते आपल्याला जीवननिष्ठा शिकवतात.

**आदिवासी मुलांकडील पारंपरिक ज्ञान**

काटेमुंढरीच्या गुरुजींनी आदिवासी मुलांची डोंगरीवरची सहल आयोजित केली होती. त्यानिमित्ताने त्यांच्यातील साहसाचे, कौशल्याचे काही प्रसंग कादंबरीत चित्रित झाले आहेत. गावापासून दोन मैलांवर असणाऱ्या डोंगरीवर मुले गुरुजींबरोबर सहलीसाठी जातात. मुलांची ती डोंगरावर चढण्याची मोहीमच होती. मुलांनी बरोबर आपापल्या

जेवणाच्या पिशव्या घेतल्या होत्या. याबरोबरच पक्षी मारण्यासाठी गलोली, तीरकामठेही त्यांच्या सोबत होते. डोंगरावर चढत असताना मोठ्या दगडांच्या आडोशाला एखादे जनावर असण्याची शक्यता असते. त्याची पाहणी करण्यासाठी कारू गोटा हा मुलगा भाला घेऊन पुढे जातो. त्याने खुणेचे एक बोट करून छोटे जनावर असल्याचे सुचविले. मग इतर सर्व मुले 'धाडी ऽऽ ओ... धाडी ऽऽ ओ....!' असे ओरडत हातातील डफ, ढोल, पिंप, घंटा यांचा आवाज करून कपारीत झोपून असलेल्या तरसाला पळवून लावतात. त्या आनंदाप्रीत्यर्थ त्या पोरांनी नाच केला. या चढाईसाठी लागणारे साहित्य एक दिवस आधीच त्या पोरांनी डोंगरावर आणून ठेवले होते. या प्रसंगातून आदिवासी मुलांच्या धाडसाचे कौतुक होते. डोंगरचढाई कशी असते, हे विद्यार्थ्यांनी या प्रयोगाद्वारे गुरुजींना दाखवून दिले. आदिवासींना पोटासाठी पक्षी, खारोट्या माराव्या लागत होत्या ही वस्तुस्थिती होती. पक्षी धरण्यासाठी पोरांनी गाडग्यातून चीक आणला होता. बांबूच्या काठीला चीक लावून झाडावर फांद्यांच्या मधोमध चिकाचा लेप लावलेली काठी ठेवली की छोटे पक्षी या काठीवर चिकटून लोंबकळत असत. जंगलात फिरताना खाजखुजलीच्या झाडांचा स्पर्श झाल्याने मुलांच्या अंगाला उठलेल्या खाजेवरचे औषध म्हणून पळसाची साल काढून घासली की खाज कमी होते, हे ज्ञान त्या पोरांना होते. आदिवासींच्या परंपरागत शहाणपणाचे हे' उदाहरण होते. अशा रीतीने आदिवासी मुलांच्या साहसाबद्दल, त्यांच्या शिकारीच्या कौशल्याबद्दल आणि जंगलातील वनौषधीच्या माहितीबद्दल गुरुजींना कुतूहल वाटते.

काटेमुंढरीच्या शाळेची मुले डोंगरावरच्या सहलीसाठी गेलेला प्रसंग गंमतीदार आहे. मुलांचे जेवण आटोपल्यानंतर त्यांना एक रांगेत उभे केले, त्यावेळी गुरुजींच्या ध्यानात आले की पाच मुले कमी आहेत. पण थोड्याच वेळात ते पाचही विद्यार्थी अलौकिक सोंगं घेऊन आली होती. शेजारच्या तळ्यातला रेडा पकडून त्यावर बसून एकाने भगवान शंकराचे सोंग घेतले होते. झाडाचे वाटोळे असलेले वेल हातापायाला गुंडाळले होते. गळ्याभोवती वेटोळ्यांतून नागफणा डोक्यावर धारण केला होता. अंगावर पांढऱ्या मातीचे पट्टे ओढले होते. हातात भाला, दुसऱ्या हातात डमरुऐवजी गाडगा असे शंकराचे हुबेहुब रूप वठवले होते. चार मुलांनी बया पक्षिणीचे घरटे अर्धे कापून डोक्यावर धारण केले होते. आणि हातापायाला झाडाच्या फांद्या बांधल्या होत्या. 'जय ऽऽ भोलानाथ'चा गजर चालला होता. अशी शोभायात्रा चालली असताना अचानक रेडा उधळला आणि त्याने खोल पाण्यात उडी घेतली. शंकराचे सोंग घेतलेल्या कारू गोटा नावाच्या मुलाला अंगाभोवती गुंडाळलेल्या वेलांमुळे पोहता येत नव्हते. तो गटांगळ्या खाऊ लागला. हा सर्व प्रकार गंभीर असला तरी खो खो हसायला लावणारा होता. आदिवासी मुलांच्या ठिकाणची कल्पनाशक्ती तसेच त्यांच्यातील साहसाचे दर्शन या प्रसंगातून घडते. या कादंबरीतील हा प्रसंग म्हणजे



आदिवासींसारख्या आदिम समाजांकडे असणारी कला, कौशल्यांचा साक्षात्कार आहे. त्यांच्या पारंपरिक ज्ञानाची शिकवण देणारा हा प्रसंग आहे.

**आदर्श शिक्षक**

काटेमुंढरी शाळेचे गुरुजी हे साने गुरुजींसारखे मातृहृदयी आहेत. अत्यंत निष्ठावान, कामाचा निर्धार, शालेय वयापासून कष्ट करण्याची जिद्द, आव्हान स्वीकारण्याचे धाडस, अध्यापन हाच धर्म मानणारे, गडचिरोली सारख्या नक्षलवादाने प्रभावित दुर्गम परिसरात काम करणारे असे हे गुरुजी शिक्षकांमधील दीपस्तंभ वाटतात. मडगू पाटलाने, 'आमच्याशी प्रामाणिक राहा, तुमची सगळी सेवा करू. आम्ही तुमच्या पायाला काटा रुतू देणार नाही,' असे सांगितले. गुरुजीसुद्धा मनात पक्का निर्धार करून, स्वतःची आचारसंहिता तयार करून काटेमुंढरीत आले होते. मद्यप्राशनाचा आग्रह झाला तरी त्यापासून दूर राहायचे, असे त्यांनी ठरविले. मडगू पाटलाच्या पडवीतच शाळा आणि गुरुजींची राहण्याची जागा होती. विद्यार्थ्यांची पटसंख्या तेवीस पण फक्त सातच मुले नियमित शाळेत येणारी आढळली. पण यात सुधारणा करणे आव्हान होते, म्हणून मडगू पाटलाच्या मध्यस्थीने गावसभा घेतली. गाववाल्यांना आवाहन करताना गुरुजी आदिवासींबरोबर कौटुंबिक नाते जोडतात. यातून गुरुजींची शिक्षणाबद्दलची आत्मियता आढळते. गुरुजींकडून आजच्या शिक्षकांना अनेक गोष्टी शिकण्यासारख्या आहेत.

शाळेत न येणारे विद्यार्थी कुठे-कुठे असतात याचा शोध घेतला. पोटाच्या सोयीसाठी ती मुले आई-वडिलांबरोबर भ्रमंती करण्यात दंग होती. आई-वडिलांना आग्रह केल्याने त्यांनी त्या मुलांना शाळेत पाठविले. कमरेला फक्त लंगोटी लावूनही विद्यार्थ्याला शाळेत प्रवेश दिला. त्या मुलांत बऱ्यापैकी हुशार असणाऱ्या शिदूची मदत गुरुजींनी घेतली. ओढ्याकाठी, नदीकाठी, हुळकीवर, जवळची यात्रा, जंगलात भटकणे अशा वेगवेगळ्या ठिकाणी शाळा भरवण्याचे प्रयोग केले. गोंडी बोलीत शाळेची प्रार्थना म्हणून दाखवली. विद्यार्थ्यांची तेवीसची पटसंख्या तीसावर गेली. मुलांना आता घरापेक्षा शाळा अधिक प्रिय वाटू लागली. गुरुजींनी सर्वच पोरं शाळेकडे वळवल्याने जनावरे राखण्याची पंचाईत झाली म्हणून कौतुकवजा तक्रार गावकऱ्यांनी केली. गुरुजींच्या कार्याचा हा सकारात्मक परिणाम होता.

गुरुजी पंचायतीच्या गावी पगार आणायला जातात त्यावेळी दोन-तीन मुले जंगलाच्या वाटेने सोबतीला येतात. गुरुजींना परत यायला उशीर झाल्याने पलिते घेऊन सर्व विद्यार्थी रात्रीच्या अंधारात वाट पाहत उभी होती, हे पाहून गुरुजी भारावून जातात. नोकरीच्या बदल्यात मिळणाऱ्या पगारापेक्षा आपण बरेच काही कमावल्याचे त्यांना वाटते. आपलं कुटुंब, मुलंबाळं शहरात राहात असलेल्या घरादाराचा त्यांना

विसर पडतो. काटेमुंढरीच्या आदिवासी मुलांना गुरुजींनी शिकण्याची ओढ निर्माण केली. त्यांच्या मनात विश्वास निर्माण केला. त्यांचा आवडता विद्यार्थी शिदू लहान भावाला सांभाळायला घरी थांबल्याने शाळेत येऊ शकत नव्हता. त्यावेळी गुरुजींनी 'तुला एकट्याला शिकवायला घरी येईन', अशी तयारी दाखवली. त्यानंतर शिदूच्या भावाला सांभाळायची व्यवस्था केली. गुरूजींनी केवळ अडचणी समजून घेतल्या नाही तर त्या सोडवण्याचा प्रयत्न केला. गुरुजी समाजात किती मिसळतात याची अनेक उदहारणे कादंबरीत आहेत. शिक्षकांने समाजाचा मार्गदर्शक बनले पाहिजेत, ही मोठी शिकवण काटेमुंढरीत मिळते.

गुरुजींनी आदिवासी मुलांना केवळ शिक्षण दिले नाही, तर त्यांनी त्यांची संस्कृती, त्यांचे प्रश्न समजावून घेण्याचा प्रयत्न केला. नातेवाईकांच्या लग्नसमारंभासाठी आठ-दहा दिवस सर्व कुटुंब जाऊन राहायचे. याचे कारण फक्त पोटभर जेवायला मिळते हेच होते. अशावेळी गैरहजर राहणाऱ्या मुलांची अपरिहार्यता त्यांनी समजवून घेतली. काटेमुंढरीचे गुरुजी हे पूर्णपणे त्या गावाचे झाले होते. अनेक अडचणींमुळे सांजगडच्या बाजाराला जाऊ न शकणाऱ्या गावकऱ्यांचा बाजार गुरुजी स्वतःच्या सायकलवरून आणत. बाजाराच्या निमित्ताने गावातील अडल्या नडल्या माणसांची सुखदुःखं गुरुजींना कळू शकत होती. आदिवासींच्या जीवनाशी समरस होणारे, त्यांना समजून घेण्याचा वसा उचलणारे हे गुरुजी होते. ते केवळ त्या शाळेचे मास्तर नाही तर 'गावमास्तर' बनले. मडगू पाटील आणि इतर गावकऱ्यांबरोबर यात्रेला जाऊन गुरुजी आदिवासींचे लोकजीवन समजवून घेतात. ज्यांना शाळेत येणे शक्य नाही अशा आदिवासी स्त्रियांसाठी त्यांनी रात्रीची शाळा सुरू केली. काटेमुंढरीच्या शाळेतील मुल-मुली, प्रौढ महिलांना अक्षरओळख करून देऊ लागले.

डोंगरावर शाळा भरविण्याच्या निमित्ताने गुरुजी मुलांना डोंगरावर घेऊन जातात. त्यावेळी त्यांनी गलोलींने तसेच काठीला चीक लावून पक्षी मारणाऱ्या मुलांना वन्य जीवनाविषयी प्रबोधन केले. 'अरे तुमचा जसा जीव, तसा त्या पक्ष्यांचाही जीव नाही का? पक्षी म्हणजे या रानाची केवळ संपत्ती नव्हे, तो जीव आहे. बारीक अळ्या, जीवजंतू, पक्षी, छोटे प्राणी, मोठे प्राणी हे सगळे मिळून ही सृष्टी आकारास येते आणि जर यातील काही जीव नष्ट झाले तर उरलेले जीवही जिवंत राहणार नाहीत.' गुरुजींनी निसर्गातील 'जीवो जीवस्य जीवनम्' हे सूत्रच मुलांना पटवून दिले. एका बाजूला पर्यावरण आणि दुसऱ्या बाजूला आदिवासींचे नैसर्गिक जीवन यांच्यातील हा संघर्ष होता, याचीही जाणीव गुरुजींना होती. तरीही ते पर्यावरणाची शिकवण देण्याचे थांबत नाहीत.

गुरुजींच्या शिक्षणकार्याची प्रसिद्धी रूपगडच्या रूपचंद महाराजांपर्यंत पोहोचते. गुरुजींचा महाराजांकडून सत्कार होतो. महाराज शाळेला चांदीच्या नाण्यांची थैली भेट



देतात. तो पैसा शाळेच्या बांधकामासाठी गुरुजींनी मडगू पाटलाकडे सुपूर्द केला. गुरुजींच्या शिक्षणकार्याला राजमान्यता मिळाली होती. गुरुजींनी स्वतःच्या एका पगाराची रक्कम मडगू पाटलाकडे दिली. नवीन शाळेचे उद्घाटन रूपचंद महाराजांच्या हस्ते झाले. गुरुजींमुळे काटेमुंढरी गावचा चेहरामोहरा बदलला. मुलांच्या शिक्षणामुळे त्यांचे आई-वडीलही व्यवहारात हुशार बनले. पंचवीस वर्षे काटेमुंढरीसारख्या गावात नोकरी करून गुरुजी निवृत्त झाले. पण त्यानंतरही त्यांचा विद्यार्थी शिदू त्या शाळेचा मुख्याध्यापक झाल्याचे आणि उत्कृष्ट शैक्षणिक, सामाजिक कार्याबद्दल, आदिवासी विभागात सेवा केल्याबद्दल त्याला राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित केल्याची बातमी वाचून गुरुजींच्या डोळ्यात आनंदाश्रू येतात. काटेमुंढरीच्या शाळेची सेवा धन्य झाल्याचे त्यांना वाटते. काटेमुंढरीतील गुरुजी हे अत्यंत प्रामाणिक, कामावर निष्ठा असणारे, प्रयत्नवादी, शालेय वयापासूनच कष्टाची जिद्द, निर्धार कायम असलेले, आव्हान स्वीकारण्याचे धाडस दाखवणारे, अध्यापन हाच धर्म मानणारे आणि त्यागी वृत्तीचे आहेत.

**सामाजिक बांधिलकी आणि मडगू पाटील**

मडगू पाटील हे काटेमुंढरीचे पाटील असतात. फारशी श्रीमंती नाही पण गावाच्या तुलनेत थोडीफार अधिक शेती. त्यांच्या शब्दावर गावचा व्यवहार चालत असे. सार्वजनिक जीवनाबद्दल त्यांच्या ठिकाणी निष्ठा होती. गुरुजींच्या ज्ञानदानाच्या कार्यात त्यांच्या बरोबरीने ते होते. शाळेसाठी आणि गुरुजींना राहण्यासाठी आपल्या पडवीत त्यांनी जागा दिली. मराठी भाषा त्यांना येत होती. त्यामुळे गुरुजींसाठी ते आधार वाटायचे. 'आमच्या गावची समदी पोरं वनात भटकत फिरतात, त्याहीस धोरणास लावा,' असे ते गुरुजींना सांगतात. यातून आदिवासी मुलांनी शिकावे, शहाणे व्हावे, याबद्दलची त्यांची भावना दिसून येते.

मडगू पाटलाच्या सहवासातून गुरुजींना आदिवासी लोकजीवनाचा जवळून अभ्यास करता आला. भीमगड, जांभूळगावच्या यात्रेला मडगू पाटील गुरुजींना घेऊन जातात. त्यावेळचा मडगू पाटलांचा पोशाख एखाद्या नाटकातील नटासारखा असतो. स्वच्छ पांढरे धोतर, ठेवणीतले चामडी जोडे, हातात घोडे हाकण्याचा चाबूक. छकड्याच्या आजूबाजूला आडदांड मल्लासारखे पाच तरुण सज्ज होते. यावेळचा पाटलाचा रुबाब म्हणजे आदिवासींच्या राजाला शोभेल असा होता. जत्रेतील देवपूजेचा मान पाटलांचा असतो.

मडगू पाटील उदार अंत:करणाची, निर्मळ मनाची व्यक्ती असते. शाळेची मुले क्रीडासंमेलनासाठी जातात त्यावेळी त्यांनी मुलांना लागणारा शिधा आणि आपली बैलगाडी दिली. त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी सोबत गावातून चार-दोन लोक पाठवले. चांगल्याचे कौतुक तसे वाईट वागणाऱ्यांवरही त्यांची जरब होती. हे गुरुजींबरोबरच्या

त्यांच्या संवादातून दिसते. 'मास्तरजी बाहेर गावी जाऊन काटेमुंढरीच्या पोरांनी काही इपरीत केलं ना... भेदऱ्याची चटणीवाणी नाही जिरवली एकेकाची तर नावाचा मडगू पाटील नाही.' मडगू पाटील हे काटेमुंढरी गावचे आधारस्तंभ होते. पाटील म्हणून त्यांनी मोठेपण मिरवले नाही. गावचा एक घटक म्हणूनच ते वावरत होते. सामाजिक बांधिलकी व सार्वजनिक धर्म त्यांच्या वागण्यातून पाहायला मिळतो. शाळेच्या बांधकामासाठी त्यांनी निर्धाराने पैसा गोळा केला. आपल्या शेतीचे पाच हिस्से केले. चार मुलांना चार हिस्से देऊन स्वतःच्या हिश्शाची जमीन विकून शाळेच्या इमारतीसाठी पैसा दिला. पंचायत समिती सदस्यांना भेटून एका खोलीच्या बांधकामासाठी निधी मिळविला. आपली पत्नी रिपाबाई पाटील हिला सुद्धा या कार्यात सामील करून घेतले. तिने माहेरून मिळालेला गळ्यातील गोफ बांधकामासाठी शाळेला दिला. एकदा गावातल्या गरीब कोळकू पाटलाच्या मुलीच्या लग्नात नवरा मुलगा चांदीच्या मुदीसाठी अडून बसला. त्यावेळी मडगू पाटलांनी स्वतःच्या करंगळीतील सोन्याची अंगठी काढून नवरदेवाच्या बोटात घातली. गावच्या छिबूचा पोरगा काटूने कुस्ती जिंकली. पुढे त्याची कुस्ती मोठ्या पैलवानाशी होणार असते. त्यासाठी त्या पोराने कुस्ती जिंकून गावाचे नाव करावे म्हणून त्याला सतत पंधरा दिवस दूध आणि खुराक पुरविला.

निसर्ग आणि पर्यावरणाबद्दल मडगू पाटलाच्या मनात प्रेम होते. जंगलात आढळणाऱ्या विविध पक्ष्यांची नावे अगदी पक्षितज्ज्ञासारखी त्यांना माहीत होती. शाळेसमोर त्यांनी बगीचा निर्माण केला. त्यात फुलझाडे, चंदन, नारळ, केळी, साग अशी झाडे लावली. मडगू पाटलांचे सामाजिक, सांस्कृतिक, पर्यावरणविषयक ज्ञान व निसर्गप्रेम उल्लेखनीय होते. काटेमुंढरीच्या गुरुजींना तर मडगू पाटलांचा सहवास म्हणजे एका देवदूताचा सहवास वाटत होता. शाळेच्या नवीन इमारतीच्या उद्घाटन सोहळ्यात रूपचंद महाराजांनी त्यांची 'जनतेचे खरे हृदयसम्राट' म्हणून प्रशंसा केली. मडगू पाटील उदार, त्यागी, दानशूर वृत्तीचे होते. पराकाष्ठेची जिद्द व सार्वजनिक जीवनाबद्दलची तळमळ त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून आढळते. अशा व्यक्तिमत्त्वांची ओळख हे काटेमुंढरीचे एक वैशिष्ट्य आहे. मडगू पाटलांकडून सामाजिक बांधिलकीची थोर शिकवण मिळते.

**आदर्श विद्यार्थी शिदू**

शिदू हा काटेमुंढरी शाळेतला गुरुजींचा आज्ञाधारक विद्यार्थी असतो. रंगाने काळासावळा पण बुद्धीने हुशार. आजपर्यंत शाळेत पोरं का येत नव्हती, त्याचे एक कारण गुरुजींना पहिल्यांदाच सांगतो, ''मास्तरजी आजवरी ज्याले कपडे नाही त्याले शाळेत येऊ देत नव्हते, म्हणून अधिक पोर शालेत येत नव्हती.'' पण गुरुजींनी यावरही उपाय सांगितला, 'लंगोटी लावूनही विद्यार्थी शाळेत आला तरी शिकता



येईल.' त्यानंतर शिदूसुद्धा शाळेत जायला लागतो. त्याने स्वतः अशा मुलांना गोळा केले. खरेतर शिदूला शिक्षणाची गोडी होती, हे त्याच्या धडपडीतून ध्यानात येते.

मुलांची पटसंख्या कशी वाढवता येईल, याबद्दल तिसरीतील शिदूने गुरुजींना उपाय सुचविताना सांगितले, ''गुरुजी, आपली शाळा कधी ओढ्याकाठी भरवू. तेथे वडाचे झाड आहे. पोरायले पारंब्यावर झोके घ्याले आवडते. आठवड्यात एक दिवस नदीकाठी शाळा भरवू. वाळूत लोळणे, पाण्यात डुबकी मारण्याची मजा येते. शाळा आपल्या मोठ्या टोल्याचे जवळचे हुळकीवर भरवू. तेथे घसरगोटीची मजा येते. पोरायले डाके खायले भेटते. खराडी, लावे, सश्याची शिकार कराले मिळते. मोठ्या मोहाचे झाडावर चीक लावून पाखरं सापडतेत गुरुजी एक दिवस शाळा तेथेही भरवू.'' शिदूची ही कल्पना शिक्षणतज्ज्ञांना व बालमानसशास्त्रज्ञांना अंतर्मुख करायला लावणारी असते. गुरुजींनीही शिदूच्या कल्पनेप्रमाणे शाळा भरवली आणि त्याचा चांगला परिणाम घडून आला. या शिदूच्या निवेदनाने शिक्षणाची दृष्टी शिकता येते. एकाएकी शिदू शाळेत गैरहजर राहिला. गुरुजींनी चौकशी केल्यानंतर समजले की, त्याच्या आत्याच्या कुटुंबातील लग्नाला गेल्याने तो आठवडाभर परत येणार नाही. लग्नाहून आल्यानंतर शिदूच्या घरी खायला काही नसते. केवळ वालाच्या एका शेंगेवर सर्वांनी भोजन केले. शिदूच्या कुटुंबातील दारिद्र्याची कल्पना यातून येते. पुढे शिदू काटेमुंढरी शाळेचा मुख्याध्यापक होतो. उत्कृष्ट शैक्षणिक, सामाजिक कार्याबद्दल, आदिवासी विभागातील सेवेबद्दल त्याला राष्ट्रपती पारितोषिक घोषित होते. गुरुजींचा आदर्श विद्यार्थी म्हणून शिदू पात्र ठरला. आपल्या गुरुजींसारखीच जिद्द बाळगून, त्यागी, प्रामाणिक आणि निष्ठापूर्वक सेवा त्याने केली.

**सेवाभावी वृत्तीचे नागोसे गुरुजी**

'माझी काटेमुंढरीची शाळा' या कादंबरीच्या अखेरीस नागोसे गुरुजी ही व्यक्तिरेखा येते. सखाराम गोमा नागोसे असे नाव असलेले नागोसे गुरुजींचे व्यक्तिमत्त्व फार प्रभावी आहे. 'गुडघ्यापर्यंत धोतर, अंगात विनाकॉलरचा सदरा, डोक्यावर गांधी टोपी, कपाळाला शुभ्र पांढरे गंध, पायात एक अंगठ्याची चप्पल, मुद्रा करारी, स्वभाव शांत, डोळ्यात अपार कष्ट करण्याची तयारी असल्याचा आत्मविश्वास, असे त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे. सतरा रुपये पगारात नोकरीला सुरुवात केलेले नागोसे गुरुजी आदिवासी भागातील अत्यंत दुर्गम अशा गट्टेवाहींच्या शाळेत शिक्षक होते. तिन्ही वर्गांना ते एकच शिक्षक होते. मुलांसाठी झटणारे म्हणून त्यांची ख्याती होती. सगळ्या विषयांत त्यांची तयारी करून घेतली. ते निर्व्यसनी होते. केवळ वर्गातल्या अभ्यासातच नाही तर क्रीडा क्षेत्रातही त्यांच्या विद्यार्थ्यांनी प्राविण्य मिळविले. ते प्रत्येक मुलाला प्रेमाने वागवत. खेळाच्या मैदानावर कोणत्याही शाळेच्या शिक्षकाला, जखमी विद्यार्थ्याला ते मदत करीत असत. दोन कट्टर विरोधी संघाची रेफरीशिप ते

प्रामाणिकपणे करीत. क्रीडा संमेलनाच्या गावी मोडक्या तोडक्या पडवीत विनातक्रार आपल्या विद्यार्थ्यांना घेऊन राहत. मुलांना स्वतः स्वयंपाक करून पंगतीला बसवून वाढत. 'आई-वडील जी सेवा करायला कंटाळतील ती सेवा नागोसे गुरुजींनी आपल्या शाळेच्या मुलामुलींची केली.' यातून त्यांचा सेवाभाव दिसून येतो.

नागोसे गुरुजींच्या या कार्याची नोंद मात्र कुठेही नाही. राज्यपाल, राष्ट्रपती पुरस्कारासाठी स्वतः प्रयत्न कधी केला नाही. त्यांनी कधीच फळाची अपेक्षा धरली नाही. काटेमुंढरीच्या गुरुजींचे आदर्शस्थान नागोसे गुरुजी होते. या आदर्श शिक्षकाच्या वाट्याला मात्र दुःख येते. गट्टेवाहीच्या शाळेतील बेपत्ता झालेला विद्यार्थी अतिरेक्यांच्या कँपमध्ये आढळल्याने त्या देवमाणसाला पोलिसांनी गंभीर स्वरूपाच्या आरोपाखाली अटक केली. त्यांच्याविरुद्ध हे कुणीतरी कारस्थान रचले होते. प्रत्यक्षात नागोसे गुरूजी निर्दोष होते. गुरुजींची जामिनावर सुटका होते पण आपल्यावर झालेल्या अन्यायामुळे ते सतत बेचैन होते. त्यांनी अन्नपाणी घेण्याचे टाळले. त्यांनी मूक सत्याग्रह केला आणि त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली. आयुष्यभर प्रामाणिक राहणाऱ्या नागोसे गुरुजींच्या वाट्यालाही काटेच येतात. समाजसेवा करणाऱ्या नागोसे गुरुजींच्या बाबतीत असे विपरीत घडते. या प्रसंगात गुरुजी समाज आणि व्यवस्थेचा चेहरा उघड करतात.

एकूणच 'माझी काटेमुंढरीची शाळा' या कादंबरीत सेवा, त्याग, नैतिकता, बांधिलकी, निष्ठा, सर्मपण अशी अनेक मूल्ये शिकवणाऱ्या व्यक्तिरेखा येतात. गुरुजींचा ध्येयवेडा स्वभाव येतो. त्यांचे निर्व्याज प्रेम अनुभवयास मिळते. शिक्षणापासून वंचित असलेल्या मुलांना शिक्षण मिळावे म्हणून केलेले प्रयोग आहेत. या प्रयोगाला विद्यार्थ्यांनी आणि आदिवासी समाजाने दिलेला प्रतिसाद, आदिवासींची जीवनरीत, त्यांची संस्कृती, दारिद्र्य अशा अनेक गोष्टी कादंबरीतील विविध प्रसंगातून चित्रित झाल्या आहेत. या सर्वातून वाचकाला नव्या जगाच्या दर्शनाबरोबर अनेक गोष्टी शिकायला मिळतात. म्हणूनच या कादंबरीचे अनेक संवेदनशील वाचक भारावून काटेमुंढरीचा शोध घ्यायला बाहेर पडतात.

■■■

---

लेखक कोल्हापूर येथील विवेकानंद कॉलेजमध्ये मराठी
विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत.

